# बृहन्मुंबई महानगरपालिका
## कामगार विभाग
## परिपत्रक

प्रकाअ/०५ दिनांक:-१६.१०.२०२५
२०२५-२०२६

विषय:- लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसास वारसाहक्काने नोकरी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती आणि मंजूरीच्या अधिकाराबाबत.

संदर्भ:- १. परिपत्रक क्र.प्र.अ/घकव्य/२३५१/एचओ दि.१०.०६.२०१६
२. परिपत्रक क्र.प्रकाअ/०७ दि.३०.१०.२०१८
३. परिपत्रक प्रकाअ/०१ दि.१६.०४.२०२५
४. परिपत्रक प्रकाअ/०४ दि.०१.०९.२०२५

लाड समिती शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसास वारसाहक्काने नोकरी देताना वेगवेगळया विभागांमध्ये वेगवेगळी कार्यपध्दती राबवली जाते. तसेच याबाबत अनेक परिपत्रके असल्याने व उक्त प्रक्रीया गुंतागुंतीची असल्याने वारसाहक्क प्रकरणे मंजूर होताना विलंब होतो व मंजूर झालेली/होणारी प्रकरणे बोगस असल्याबाबतच्या तक्रारी मोठया प्रमाणात येत असतात. या सर्व पार्श्वभूमीवर वारसाहक्क नोकरी मंजूर करण्याची कार्यपध्दती सुधारण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार यापुढे विषयांकीत प्रकरणांसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती राबविण्यात यावी:-

**(अ) प्रकरण तयार करणे, मंजूरी व तदनंतरची कार्यपध्दती:-**

**(१) वारसाहक्क प्रकरण मंजूरीसाठी तयार करण्यासाठीची पूर्वतयारी :-**

१.१ जे सफाई कामगार नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत अशांच्या बाबतीत सफाई कामगारास सेवानिवृत्तीच्या ०३ महिने अगोदर आणि ज्या सफाई कामगारास महानगरपालिका वैद्यकीय परिक्षकांनी दिलेल्या दाखल्यानुसार पुढील सेवेसाठी कायमचे अपात्र (असमर्थ) ठरविलेले आहे/सेवेत असताना निधन झाले आहे/१५ वर्षे अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे अशा सफाई कामगारांच्या बाबतीत उक्त घटनेच्या १५ दिवसांच्या आत सोबत जोडलेला वारसाहक्क नोकरीच्या अर्जाचा नमुना आणि प्रतिज्ञापत्र/शपथपत्र नमूना **(जोडपत्र १ ते ९)** यांच्या प्रती संबंधीत सफाई कामगारास/ वारसास १५ दिवसाच्या मुदतीत संबंधित प्रशासकीय अधिकारी (**परिशिष्ट-अ मधील प्राधिकारी क्र.१**) यांनी द्याव्यात. जोडपत्र १ ते ९ महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/ या संकेतस्थळावरील उज्ज्वल भविष्याकरीता-सर्व नोकरीच्या संधी या शिर्षाखाली उपलब्ध आहे.

१.२) अर्जदाराकडून विहित नमून्यातील अर्ज आणि प्रतिज्ञापत्र/शपथपत्र **(जोडपत्र १ ते ९)** प्राप्त झाल्यानंतर सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती (**उदा.** आधार कार्ड, पॅन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंदणी प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे, शिधापत्रिका, तसेच वारसाहक्क उमेदवार विवाहीत महिला असल्यास विवाह प्रमाणपत्र, नावातील बदलाबाबतचे राजपत्र इत्यादी) स्वयं साक्षांकित केल्याची खातरजमा

करुन **परिशिष्ट-अ** येथील प्राधिकारी क्र.१ (प्रशासकीय अधिकारी/संबंधित आस्थापना अधिकारी) यांनी मूळ कागदपत्रे तपासून छायांकीत प्रती साक्षांकित करावयात. **परिशिष्ट-अ** येथील प्राधिकारी क्र.१ यांनी अशा अर्जाची नोंद आवक-जावक नोंद वहित असल्याची खातरजमा करुन आवक-जावक नोंदणी क्रमांक व दिनांकाची नोंद माजी सफाई कामगाराच्या सेवाभिलेखात त्यांचे सही व शिक्कानिशी घ्यावी.

**(२) वारसाहक्क प्रकरण तयार करणे :-**

वारसाहक्काने नोकरी देण्याबाबत सर्व कागदपत्रांची तपासणी करुन सोबतच्या **परिशिष्ट-अ** येथील प्राधिकारी क्र.१ यांनी प्रस्ताव **परिशिष्ट-ड** या नमुन्यात तयार करुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधील प्राधिकारी क्र.२ यांच्याकडे शिफारस करण्यासाठी पाठवावा.

**सदर परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वीच्या परिपत्रकानुसार विहित नमून्यातील प्रस्ताव/शपथपत्र सादर केले असल्यास त्याच नमून्यात प्रस्ताव/शपथपत्र सादर करावेत.**

**(३) वारसाहक्क प्रकरण तपासणी करणे :-**

**परिशिष्ट-अ** मधील प्राधिकारी क्र.२ यांनी वारसाहक्क नोकरी देण्याबाबतच्या **नमुना परिशिष्ट-ड** मधील प्रस्तावास शिफारस करुन प्रस्ताव प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे पडताळणीसाठी पाठवावा.

**(४) वारसाहक्क प्रकरण पडताळणी करणे :-**

**परिशिष्ट-अ** मधील प्राधिकारी क्र.३ यांनी **नमुना परिशिष्ट-ड मधील प्रस्ताव** संपूर्ण पडताळणी करुन आपल्या अभिप्रायासह प्राधिकारी क्र.४ यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवावा.

**(५) वारसाहक्क प्रकरण मंजूर करणे :-**

वारसाहक्क प्रकरण मंजूरीसाठी खातेनिहाय पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी -

५.१ **घन कचरा व्यवस्थापन खात्यातील प्रकरणे:-** उक्त प्रकरणांसाठी परिमंडळीय स्तरावर खालीलप्रमाणे वारसाहक्क मंजूरी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| परिमंडळीय उप आयुक्त/सह आयुक्त (प्राधिकारी क्र.४) | अध्यक्ष |
| सह प्रमुख कामगार अधिकारी/ विभागीय कामगार व कल्याण अधिकारी | सचिव |
| मुख्य पर्यवेक्षक/ उप मुख्य पर्यवेक्षक | सदस्य |
| विभागातील प्रशासकीय अधिकारी (घनकचरा व्यवस्थापन खाते) | सदस्य |

(**टिप**- उप आयुक्त (सा.प्र.) हे वेळोवेळी परिमंडळ निहाय सह प्रमुख कामगार अधिकारी/ विभागीय कामगार व कल्याण अधिकारी यांची प्राधिकारी क्र.३ म्हणून नेमणूक करतील).

घन कचरा व्यवस्थापन खात्यातील प्रकरणांबाबत संबंधित परिमंडळीय उप आयुक्त/सह आयुक्त यांनी उक्त समितीची बैठक आयोजित करुन बैठकीत प्रकरण मंजूर/नामंजूर करण्याबाबतचा निर्णय घेतील. आवश्यकता असल्यास त्या - त्या प्रकरणाशी संबंधित माजी कर्मचारी/अर्जदार यांना बैठकीसाठी उपस्थित राहण्याची सुचना देतील. उक्त समितीची बैठक प्रत्येक महिन्यात किमान एकदा आयोजित करणे बंधनकारक राहील.

५.२ **घन कचरा व्यवस्थापन खात्याव्यतिरिक्त प्रकरणांमध्ये:- परिशिष्ट अ** मधील प्राधिकारी क्र.४ यांनी **नमुना परिशिष्ट-ड मधील प्रस्तावाची** पडताळणी करुन आवश्यकता असल्यास त्या-त्या प्रकरणाशी संबंधित माजी कर्मचारी/अर्जदार/अधिकारी यांची संयुक्त बैठक/ सुनावणी घेऊन त्यांच्या स्तरावर प्रकरण मंजूर/नामंजूर करण्याची कार्यवाही करावी.

(६) **वारसाहक्क प्रकरण मंजूर/नामंजूर झाल्यानंतर करावयाची कार्यवाही:-**

६.१) प्राधिकारी क्र.४ यांनी मंजूर/नामंजूर केलेल्या वारसाहक्क प्रकरणांची नस्ती प्रमुख कामगार अधिकारी यांच्याकडे पाठवावी.

६.२) प्रमुख कामगार अधिकारी यांनी उक्त प्रकरणांची नोंद मध्यवर्ती नोंदवहीत घेतील. नामंजूर झालेली प्रकरणे **परिशिष्ट-अ** मधील प्राधिकारी क्र.1 यांच्याकडे परत पाठवावी.

६.३) मंजूर झालेल्या 'ड' संवर्गातील प्रकरणांबाबत प्रमुख कामगार अधिकारी यांनी उमेदवारांचे वैद्यकीय स्वास्थतेचे प्रमाणपत्र व पोलीस पडताळणी/चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही कमाल दोन महिन्यात करावी. वारसाहक्क उमेदवाराचे चारित्र्य/पूर्व चारित्र्य पडताळणी सदोष/असमाधानकारक असल्यास अशी प्रकरणे परिपत्रक क्र.एमपीएम/२/१९९८ दि.२५.०५.२०१७ अन्वयेच्या निर्देशानुसार चारित्र्य पडताळणी समितीसमोर ठेवावी व सदर समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

६.४) 'सफाई कामगार' या पदास वारसाहक्क प्रकरण मंजूर असल्यास, अर्जदारास माजी कर्मचाऱ्याची सेवा समाप्त झालेल्या आस्थापनेवर नियुक्तीसाठी पाठवावे. उक्त आस्थापनेवर/खात्यात सफाई कामगाराचे पद उपलब्ध नसल्यास इतर खात्यात रिक्त असलेल्या सफाई कामगार या पदावर नियुक्तीसाठी पाठवावे.

६.५) शैक्षणिक अर्हतेनुसार/वारसाच्या विनंतीनुसार सफाई कामगार पदाऐवजी 'कामगार/कक्षपरिचर/आया/कार्यालयीन शिपाई' या पदासाठी प्रकरण मंजूर असल्यास, संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे नियुक्तीसाठी पाठवावे. शैक्षणिक अर्हतेबाबतचा संक्षिप्त तपशील सोबतच्या **परिशिष्ट-क** मध्ये नमूद आहे.

६.६) 'कार्यकारी सहायक'/'कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक' या 'क' संवर्गातील पदांकीरता वारसाहक्क प्रकरण मंजूर असल्यास,संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी उक्त अनु.क्र.६.३ नुसार नियुक्तीपूर्वीची कार्यवाही करुन नियुक्तीची पुढील कार्यवाही करावी.

६.७) प्रमुख कामगार अधिकारी यांनी वारसाहक्क मंजूर प्रकरणांची नस्ती SCAN करुन महानगरपालिकेच्या ई-ऑफिस प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या प्रमुख कामगार अधिकारी यांच्या ई-ऑफिस आयडी (ID)मध्ये जतन करुन ठेवावी.
सदर ई-ऑफिस प्रणालीसाठी आवश्यक असणारी उपकरणे, व्यवस्था माहिती तंत्रज्ञान विभागाने उपलब्ध करुन द्यावी.

(७) **नियुक्ती प्राधिकारी यांनी करावयाची कार्यवाही:-**

७.१) नियुक्ती प्राधिकारी/प्रशासकीय अधिकारी यांनी मंजूर प्रकरणांची नस्ती प्राप्त झाल्यानंतर वारसाहक्क उमेदवाराने नोकरीसाठी सादर केलेल्या नस्तीमधील छायांकित प्रती आणि मूळ कागदपत्रांची पुन:तपासणी करावी.

७.२) वारसाहक्क उमेदवारास नियुक्तीचे कार्यालयीन आदेश दिल्यानंतर माजी सफाई कामगाराच्या सेवाभिलेखात त्याबाबतची नोंद घ्यावी. सेवाभिलेख इतर खात्यात असल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्याने कार्यालयीन आदेशाची प्रत संबंधित खात्याकडे सेवाभिलेखात नोंद घेण्यासाठी पाठवावी व त्याबाबतची पोच पावती प्राप्त करुन घ्यावी.

७.३) वारसाहक्क प्रकरणांची मुळ नस्ती जतन करण्याची तसेच कागदपत्रात कोणतेही फेरफार होणार नाहीत याबाबतची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/प्रशासकीय अधिकारी यांची राहील. सदर मूळ नस्ती त्या नवनियुक्त कर्मचाऱ्याची वैयक्तिक धारिणी म्हणून परिरक्षीत करावी.

७.४) माजी सफाई कामगारास सेवा निवासस्थान दिले असल्यास हस्तांतरणाची कार्यवाही/नव्याने सेवा निवासस्थान द्यावयाचे असल्यास त्याबाबतची कार्यवाही संबंधित खाते प्रमुखांनी त्या खात्यात असलेल्या धोरणानुसार करावी.

८) **अहवाल सादर करणे:-**

८.१) नियुक्ती प्राधिकारी यांनी वारसाहक्क धोरणानुसार प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा अहवाल **परिशिष्ट-इ** मधील तक्त्यात प्रत्येक महिन्याच्या ५ ते ७ तारखेच्या दरम्यान प्रमुख कामगार अधिकारी यांना इमेलद्वारे **Excel Sheet** मध्ये पाठवावा.

८.२) प्रमुख कामगार अधिकारी हे प्रलंबित वारसाहक्क प्रकरणांचा अहवाल **नमुना-परिशिष्ट-इ मध्ये व मंजूर प्रकरणांचा अहवाल परिशिष्ट-फ मध्ये** प्रत्येक महिन्याच्या १५ ते २० तारखेच्या दरम्यान उप आयुक्त (सा.प्र.), उप आयुक्त (घकव्य) व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांना सादर करावी.

९) **वारसाहक्क नोकरी देखरेख समिती (मॉनिटरिंग कमिटी):-**

९.१) वारसाहक्क नोकरी देखरेख समिती (मॉनिटरिंग कमिटी) खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | अध्यक्ष |
| उप आयुक्त (सा.प्र.) | उपाध्यक्ष |
| प्रमुख कामगार अधिकारी | सचिव |

९.२) वारसाहक्क प्रकरणांच्या बाबतीत दोन महिन्यातून एकदा वारसाहक्क नोकरी देखरेख समिती (मॉनिटरिंग कमिटी) यांची बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

९.३) सदर बैठकीत **परिशिष्ट-इ, परिशिष्ट-फ** नुसार प्राप्त झालेल्या अहवालाचा आढावा घेण्यात यावा.

९.४) उक्त नमूद बैठकीत आवश्यकता असल्यास परिशिष्ट-अ मधील प्राधिकारी यांना पुढील बैठकीसाठी उपस्थित राहण्याबाबत समिती सचिव म्हणजेच प्रमुख कामगार अधिकारी यांच्यामार्फत अवगत करण्यात यावी.

१०) महानगरपालिकेत ज्या पदास वारसाहक्क नोकरी लागू आहे अशा खाते निहाय निश्चित केलेल्या पदांचा तक्ता (**परिशिष्ट-ब**) सोबत जोडला असून वारसाहक्क नोकरीबाबतची प्रकरणे परिपत्रक क्र.प्रकाअ/०१ दि.१६.०४.२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निकाली काढावीत.

सद्य:स्थितीत घन कचरा व्यवस्थापन खात्यातील अनुकंपा धोरणांतर्गत नोकरीबाबतच प्रस्ताव परिपत्रक क्र.प्र.अ/घकव्य/२३५१/एचओ दि.१०.०६.२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या विहित नमुन्यात तसेच त्यासोबत शपथपत्र/प्रतिज्ञापत्राच्या विहित नमून्यात सादर केली जातात. यापुढे असे न करता अशी प्रकरणे प्रमुख कामगार अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र.प्रकाअ/०७ दि.३०.१०.२०१८ सोबतच्या विहित नमून्यात तसेच

विहित शपथपत्र/प्रतिज्ञापत्राच्या नमून्यातच सोबतच्या **परिशिष्ट-अ** मधील प्राधिकारी क्र.४ यांचेकडे मंजूरीसाठी सादर करावीत.

११) **परिपत्रक अधिक्रमित केल्याबाबतः-** वारसाहक्क धोरणांतर्गत नोकरी संबंधी यापूर्वी निर्गमित केलेल्या परिपत्रकांपैकी क्र.प्रकाअ/०१ दि.१६.०४.२०२५ आणि परिपत्रक क्र.प्रकाअ/०४ दि.०१.०९.२०२५ अन्वयेची परिपत्रके वगळून अन्य सर्व परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सर्व खातेप्रमुख/उप आयुक्त/सह आयुक्त यांनी यापूढे वारसाहक्क नोकरी प्रकरणे निकाली काढण्यासाठी सदर पारिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी/अधिकारी यांना द्याव्यात. तसेच वारसाहक्क प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेऊन प्रकरणे जलद गतीने निकाली काढली जातील याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या http://hrcircular.mcgm.gov.in/hr/Circular/GAD/CHLO या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/-१३.१०.२०२५ | सही/-१५.१०.२०२५ | सही/-१५.१०.२०२५ |
| (सुनिल जांगळे) | (किरण दिघावकर) | (किशोर गांधी) |
| प्रमुख कामगार अधिकारी | उप आयुक्त (घन कचरा व्यवस्थापन) | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) |

| | |
|---|---|
| सही/-१५.१०.२०२५ | सही/-१५.१०.२०२५ |
| (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रतः- सर्व खाते/विभाग/रुग्णालय प्रमुख यांच्या माहितीसाठी रवाना.

16/10/25

सह प्रमुख कामगार अधिकारी (पूर्व.उप)प्र.

# परिशिष्ट-अ

**खाते/विभाग/रुग्णालयातील वारसाहक्क प्रकरणांची छाननी/शिफारस/पडताळणी/मंजूरी प्राधिकारी बाबतचा तक्ता**

| अनु क्र. | खाते/विभाग/ रुग्णालय | प्राधिकारी-१ (परिशिष्ट-ड या नमुन्यात प्रकरण तयार करणे, छाननी करणे) | प्राधिकारी-२ (प्रकरणांची शिफारस करणे) | प्राधिकारी-३ (प्रकरणांची पडताळणी करणे) | प्राधिकारी-४ (प्रकरणांस मंजूरी देणे) |
|---|---|---|---|---|---|
| अ) | १) घन कचरा व्यवस्थापन | प्रशासकीय अधिकारी | संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | परिमंडळीय उप आयुक्त/ सह आयुक्त |
| | २) कार्यकारी अभियंता (परिवहन) | प्रशासकीय अधिकारी | कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप आयुक्त/ सह आयुक्त (परिमंडळ ०१) |
| | | | कार्यकारी अभियंता (परिवहन)पू.उप | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप आयुक्त/ सह आयुक्त (परिमंडळ ०६) |
| | | | कार्यकारी अभियंता (परिवहन) प.उप | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप आयुक्त/ सह आयुक्त (परिमंडळ ०३) |
| ब | सर्व विभाग (ए ते टि वॉर्ड) | प्रशासकीय अधिकारी | संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | परिमंडळीय उप आयुक्त/ सह आयुक्त |
| क | सार्वजनिक आरोग्य, शिक्षण,जल, सुरक्षा, अग्निशमन,उद्याने मलनि:सारण, प्रमुख रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये इत्यादी | प्रशासकीय अधिकारी | खाते प्रमुख/ अधिष्ठाता | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | संबंधित खात्याचे उप आयुक्त/ सह आयुक्त |
| ड | मालमत्ता, बाजार | प्रशासकीय अधिकारी | सहाय्यक आयुक्त | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप आयुक्त/ सह आयुक्त |
| इ | दुकाने व अस्थापना, चौकशी व अन्य खाते | संबंधित आस्थापना अधिकारी | संबंधित खाते प्रमुख | प्रमुख कामगार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप आयुक्त/ सह आयुक्त |

(**टिप-** उप आयुक्त (सा.प्र.) हे वेळोवेळी परिमंडळ निहाय सह प्रमुख कामगार अधिकारी/विभागीय कामगार व कल्याण अधिकारी यांची प्राधिकारी क्र.३ म्हणून नेमणूक करतील).

# परिशिष्ट-ब

**बृहन्मुंबई महानगरपालिकेत ज्या पदास वारसाहक्क नोकरी लागू आहे अशी खाते निहाय निश्चित केलेली पदे खालीलप्रमाणे आहेत.**

| क्र. | खाते/विभाग/ रुग्णालये | पदनाम | सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी देण्याबतचे धोरण लागू केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन | मोटरलोडर, स्कॅव्हेंजर, हलालखोर, स्वीपर (सफाईगार), ड्रेनक्लीनर, स्वीपर-कम-हलालखोर, स्वीपर-कम-ड्रेनक्लीनर, ड्रेनक्लीनर-कम-स्वीपर, स्कॅव्हेंजर-कम-हलालखोर, कामगार, मुकादम | १२.०८.१९७५ |
| २ | मालमत्ता | स्वीपर (सफाईगार), स्वीपर-कम-हलालखोर, प्लंजरमन, हलालखोर, ड्रेनक्लीनर, स्कॅव्हेंजर, मुकादम | ०२.१२.१९८९ |
| ३ | सार्वजनिक आरोग्य खाते | सफाईगार (पुरुष/महिला), सफाईगार-नि-सेवक | ०१.१२.२००५ |
| ४ | बाजार | मेहतर (हलालखोर), कामगार-नि-मेहतर (लेबर-कम-हलालखोर पुरुष/महिला) महिला मेहतर (लेडी हलालखोर) | ०१.१२.२००५ |
| ५ | शिक्षण | हमाल, सफाईगार (पुरुष/महिला) | ०१.१२.२००५ |
| ६ | मलनि:सारण | बुचवाला (प्लंजरमन), डायवर (पाणबुडया), मेहतर-नि-सफाईगार, सफाईगार-नि-मेहतर | ०१.१२.२००५ |
| ७ | सर्व विभागीय कार्यालये व इतर सर्व खाते | सफाईगार (पुरुष/महिला), हलालखोर, सफाईगार-नि-मेहतर, सफाईगार-नि-प्रसाधनगृह स्वच्छक, माळी-नि-सफाईगार,कामगार-नि-सफाईगार | ०१.१२.२००५ |

# परिशिष्ट-क

अर्जदाराने वारसाहक्क धोरणांतर्गत शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरीसाठी अर्ज केल्यास खालील प्रमाणे पदनिहाय अर्हता लागू राहील.

| अनु क्र | गट | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १) | ड | सफाई कामगार | शैक्षणिक अर्हता नाही. |
| २) | ड | कामगार/ कक्षपरिचर/ आया/हमाल | सध्यस्थित मान.उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांनी संदर्भ क्र.८७२८ दि.२१.११.२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार उमेदवार किमान इयत्ता १० वी (माध्यमिक शालांत परिक्षा) १०० गुणांच्या मराठी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. भविष्यात सदर अर्हतेत सुधारणा झाल्यास ती अर्हता लागू राहील. |
| ३) | ड | कार्यालयीन शिपाई | उमेदवार किमान इयत्ता १२ वी (उच्च माध्यमिक शालांत परिक्षा) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत १०० गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. भविष्यात सदर अर्हतेत बदल झाल्यास ती अर्हता लागू राहील. |
| ४) | क | कार्यकारी सहायक (लिपिक) | परिपत्रक क्र.एमपीआर/९९८९ दि.२४.०१.२०२५ अन्वये अर्हता लागू आहे. भविष्यात सदर अर्हतेत बदल झाल्यास ती अर्हता लागू राहील. |
| ५) | क | कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक | परिपत्रक क्र.प्र.ले/ससावि/नप्र/०५ दि.०३.०६.२०२१ अन्वये अर्हता लागू आहे.भविष्यात सदर अर्हतेत बदल झाल्यास ती अर्हता लागू राहील. |

**(टिप- अ) अनु.क्र.२ आणि ३ मधील शैक्षणिक अर्हता सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त/निधन/वैद्यकीयदृष्टया असमर्थ (अपात्र) प्रकरणांसाठी लागू राहतील.**

**ब) उपरोक्त अनु क्र.०२ ते ०५ मधील पदावर नोकरी स्विकारल्यास सदर उमेदवाराच्या वारसास वारसाहक्क नोकरीच्या तरतूदी लागू राहणार नाहीत.**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**लाड समिती शिफारशीनुसार वारसाहक्क धोरणांतर्गत नोकरीसाठी सर्व खाते/विभाग/रुग्णालय प्रमुख/ प्रशासकीय अधिकारी/नियुक्ती प्राधिकारी/सहाय्यक आयुक्त/अधिष्ठाता यांनी सादर करावयाचा प्रस्ताव**

( प्रस्तावावर पूर्तता केलेल्या बाबींचा पृष्ठ क्रमांक नमूद करावा)

## परिशिष्ट-ड

उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र घट्ट चिकटवून त्यावर प्रशासकीय अधिकारी यांनी शिक्का मारुन स्वाक्षरी करावी.

माजी कर्मचाऱ्याचे नाव श्री/श्रीमती ------------------------------------------------------ (पदनाम)-----------------, कर्मचारी संकेतांक क्र.--------------यांचा/यांची पती/पत्नी,मुलगा/मुलगी, सून/जावई, विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटित मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहीत सज्ञान मुलगी/अविवाहीत सज्ञान बहिण/नात/नातू/सफाई कर्मचारी अविवाहीत असल्याने सख्खा भाऊ/सख्खी बहिण, नामनिर्देशित व्यक्ती श्री/श्रीमती-------------------------------------------------------------यांनी वारसाहक्क धोरणानुसार नोकरीसाठी विहित नमुन्यात(**जोडपत्र-१**) दि.------------ रोजी अर्ज केलेला आहे ( प- ).

**माजी सफाई कामगाराचा सेवा अभिलेख तपासून कार्यालयाने सादर करावयाचा प्रस्ताव.**

| अ) | माजी सफाई कामगाराची माहिती | |
|---|---|---|
| १. | माजी सफाई कामगाराचे संपूर्ण नाव | श्री/श्रीम. ____________ |
| अ | पदनाम/हुद्दा | ____________ (पृ.क्र.प- ) |
| ब | कर्मचारी संकेतांक | ......................... (पृ.क्र.प- ) |
| क | खाते/विभाग/रुग्णालय | ____________ (पृ.क्र.प- ) |
| ड | धर्म/जात व पोटजात | ____________ (पृ.क्र.प- ) |
| इ | माजी सफाई कामगाराचा एकूण सेवाकाल | ........ वर्ष ........ महिना ........ दिवस |
| ई | सफाई कामगार पदावरील नेमणूकीचा दिनांक | दिनांक- ......................... |
| उ | अखंड सेवेतील सेवासातत्य दिनांक | दिनांक -......................... |
| ऊ | माजी सफाई कामगाराची पदोन्नतीने/बदलीने/ निवडीने/खात्याअंतर्गत चतुर्थ श्रेणीत वा तत्सम/ समकक्ष पदावर नियुक्ती दिली असल्यास, | १) प्रथम नियुक्तीचे पदनाम:-________(पृ.क्र.प- )<br>२) पदोन्नतीचे पदनाम:- ________(पृ.क्र.प- )<br>३) पदोन्नती दिनांक:- ..........................<br>४) निवडीचे पदनाम:-________(पृ.क्र.प- )<br>५) निवडीचा दिनांक:-...............................<br>६) इतर माहिती:- ________(पृ.क्र.प- ) |

| | | |
|---|---|---|
| २. | २.१.माजी सफाई कामगार महानगरपालिका निवासस्थान धारक आहे का ? असल्यास त्याचा संपूर्ण पत्ता<br>२.२.असल्यास, सहा.मुख्य पर्यवेक्षक/संबंधित अधिकारी यांचेकडून चाळ नोंद पुस्तकावरुन कुटुंबस्थिती प्रमाणपत्र प्राप्त करुन नस्तीत सादर करावे. | होय/नाही<br>---------------------------------------<br>---------------------------------------<br>(पृ.क्र.प-       ) |
| अ | माजी सफाई कामगाराचा स्थानिक आणि पत्रव्यवहाराचा पत्ता:- | ---------------------------------------<br>---------------------------------------<br>--------------------------------------- |
| ब | गावचा पत्ता:- | ---------------------------------------<br>--------------------------------------- |
| ३. | माजी सफाई कामगाराने १५ वर्षे अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे का ?असल्यास स्वेच्छानिवृत्ती दिनांक नमूद करावा ?<br>स्वेच्छानिवृत्ती मंजुर केल्याचे ज्ञाप नस्तीत सादर करावे. | होय.<br>माजी सफाई कामगार १५ वर्षे अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर दि. ..................पासून स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे.<br>(पृ.क्र.प-       ) |
| ४. | माजी सफाई कामगार महानगरपालिका सेवेत असताना नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत का? असल्यास दिनांक आणि सेवानिवृत्तीची सूचना नस्तीत सादर करावी. | **होय.**<br>माजी सफाई कामगार सेवेतून दि............... (का.वे.नं.) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाला आहे (पृ.क्र.प-       ) |
| ५. | माजी सफाई कामगाराचा सेवेत असताना मृत्यू झाला आहे का ? असल्यास मृत्यू दिनांक आणि मृत्यू दाखला | होय/नाही/मृत्यू दिनांक..............................<br>(पृ.क्र.प-       ) |
| ६. | माजी सफाई कामगारास सेवेत असताना महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक यांनी वैद्यकीयदृष्टया कायमचे अपात्र (असमर्थ) घोषित केले आहे का? केले असल्यास दिनांक आणि वैदयकीय परिक्षकांचा दाखला नस्तीत सादर करावा. | होय/नाही दिनांक ..........................<br>अपात्र (असमर्थ) दिनांक .....................<br>(पृ.क्र.प-       ) |
| ७. | माजी सफाई कामगाराचा शेवटचा हजेरी दिनांक | दि. ....................सेवा अभिलेखानुसार |
| ८. | माजी सफाई कामगाराने वारसाहक्क नोकरीसाठी नामनिर्देशित केलेल्या वारसाचे/नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे नाव आणि त्याची नोंद घेतलेल्या सेवाभिलेखातील पृष्ठाची प्रत सादर करावी. | माजी सफाईकामगारचे वारस श्री/श्रीम.--------- ------------------यांना नामनिर्देशित केले आहे.<br>(पृ.क्र.प-       ) |
| ९. | माजी सफाई कामगाराने वारसाला/नामनिर्देशित व्यक्तीला नोकरी देण्याकरिता सादर केलेल्या अर्जाच्या आवक-जावक नोंद वहीची साक्षांकीत प्रत सादर करावी. | आवक-जावक नोंद वहिची छायांकित प्रत<br>(पृ.क्र.प-       ) |

| | | |
|---|---|---|
| १०. | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त/निधन /वैद्यकीयदृष्टया अपात्र (असमर्थ) ठरविल्यामुळे माजी सफाई कामगाराच्या वारसांना मिळालेले/ मिळणारे फायदे कोणाच्या नावे प्रस्तावित/मंजूर झाले आहेत. | माजी सफाईकामगार श्री/श्रीम.------------------------------------------------- <br> वारसदार श्री/श्रीम.------------------------------------------------------- |
| ११. | **अ)** सेवा अभिलेखाप्रमाणे वारसदाराचे/नामनिर्देशित व्यक्तीचे नाव (देय दाव्यांसाठी) <br> **ब)** परिपत्रक क्र.प्रकाअ/०४ दिनांक.०१.०९.२०२५ अन्वये वारसाहक्क नोकरीसाठी नामनिर्देशीत व्यक्ती | **अ)**श्री/श्रीम------------------------------------------- <br> नाते------------------------ <br> **ब)**श्री/श्रीम------------------------------------------ <br> यांना वारसाहक्क नोकरीसाठी नामनिर्देशन केले आहे. |
| १२. | मासिक निवृत्ती वेतन कोणाच्या नावे प्रस्ताविण्यात आले किंवा देण्यात आले आहे. <br> (निवृत्तीवेतनधारकाचे नाव नमूद करावे). | श्री/श्रीम------------------------------------------ <br> -------------------------- |
| १३. | भविष्य निर्वाह निधी दावे कोणाच्या नावे निकाली काढले/प्रस्ताविले आहेत त्याचे नाव नमूद करावे. | श्री/श्रीम------------------------------------------ <br> नाते------------------------------------------- |
| १४. | विमा दावा कोणाच्या नावे प्रस्ताविला आहे त्यांचे नाव नमूद करावे. | श्री/श्रीम------------------------------------------ <br> नाते------------------------------------------- |
| १५. | माजी सफाई कामगारावर अवलंबून असणा-या कोणत्याही एखाद्या वारसाला यापूर्वी वारसाहक्क नोकरी देण्यात आली होती का?(माजी सफाई कामगाराच्या सेवाअभिलेखावरुन पडताळणी करुन सादर करावे) | माजी कर्मचा-याच्या वारसास यापूर्वी नोकरी देण्यात आली नाही. (याबाबत सेवाभिलेखावरुन खातरजमा केली आहे.) (पृ.क्र.प- ) |
| १६. | माजी सफाई कामगाराच्या कुटुंबातील एकूण सभासदांची संख्या <br> अ) कमविणारे सभासद <br> ब) न कमविणारे सभासद <br> क) एकूण सभासद | अ) कमविणारे सभासद- <br> ब) न कमविणारे सभासद - <br> क) एकूण सभासद - <br> (पृ.क्र.प- ) |

वरील अनु.क्र.१ ते १६ मधील माहिती माजी सफाई कामगाराच्या सेवाअभिलेखावरुन पडताळणी व खातरजमा करुन सादर करण्यात आलेली आहे. सदर माहिती खरी आहे.

आस्थापना लिपिक
(कर्मचारी नाव/संकेतांक/स्वाक्षरी)

आस्थापना मुख्य लिपिक-
(कर्मचारी नाव/संकेतांक/स्वाक्षरी)

| ब) | **अर्जदाराची सविस्तर माहिती** | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव:-<br>स्त्री अर्जदार विवाहीत असल्यास-<br>(विवाह पूर्वीचे आणि विवाह नंतरचे नाव नमूद करावे) | श्री/श्रीम- ________________<br>श्रीम. ________________ |
| अ | माजी सफाई कामगारासोबत असलेले नाते | नाते- ________________ |
| ब | I)अर्जदाराचा वास्तव्याचा पत्ता:-<br><br>II) आधार कार्ड-<br>III) पॅन कार्ड-<br>IV) शिधापत्रिका-<br>V) निवडणूक ओळखपत्र- | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>..................................(पृ.क्र.प- )<br>..................................(पृ.क्र.प- )<br>..................................(पृ.क्र.प- )<br>..................................(पृ.क्र.प- ) |
| क | स्थानिक पत्ता:- | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>---------------------------------------- |
| ड | मूळ गावचा पत्ता:- | ----------------------------------------<br>---------------------------------------- |
| इ | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (शालेय प्रमाणपत्र, मराठी व इंग्रजीचे टंकलेखन तसेच एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण केली असल्यास त्याचे प्रमाणपत्र ) | शैक्षणिक अर्हता- ......................... उत्तीर्ण<br>अ)शाळा सोडल्याचा दाखला (पृ.क्र.प- )<br>ब)गुणपत्रिका आणि प्रमाणत्र<br>i) एस.एस.सी. (पृ.क्र.प- )<br>ii) एच.एस.सी. (पृ.क्र.प- )<br>iii) पदवी (पृ.क्र.प- )<br>iv) एम.एस.सीआयटी (पृ.क्र.प- )<br>v) टंकलेखन- मराठी (पृ.क्र.प- )<br>इंग्रजी (पृ.क्र.प- ) |
| ई | अ) अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखल्यानुसार/जन्म दाखल्यानुसार जन्म दिनांक<br>ब) एलओ/२२ दिनांक २९.१०.१९९० प्रमाणे शाळा सोडल्याचा दाखला पडताळला आहे का ? | अ) जन्म दिनांक- ............................<br>(पृ.क्र.प- )<br>ब) होय.<br>(पृ.क्र.प- ) |
| उ | i) अर्जदाराचा धर्म/जात/जातीचा दाखला (असल्यास) सादर करावे.<br>ii) सफाई कामगार पदाव्यतीरिक्त 'कामगार/कक्षपरिचर/आया/हमाल/कार्यालयीन शिपाई/कार्यकारी सहायक/क.ले.प.व ले.स.' या पदासाठी आरक्षण आणि बिंदुनामावली पडताळणीचे धोरण लागू आहेत. अर्जदाराने सदर पदास अर्ज केल्यास जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)सादर करावे. | धर्म:-<br>जात:-<br>जातीच्या दाखल्यानुसार जात प्रवर्ग- ----------<br>-------------------- (पृ.क्र.प- )<br>जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास)<br>आहे/नाही (पृ.क्र.प- ) |

| | | |
|---|---|---|
| २ | माजी सफाई कामगाराचा मृत्यू व वारस दाखला/वारस दाखला सादर करावा. | अ)मृत्यू व वारस दाखला (पृ.क्र.प- )<br>ब)वारस दाखला (पृ.क्र.प- ) |
| ३ | माजी सफाई कामगाराची पगाराची पावती, ओळखपत्राची छायांकित प्रत, भविष्य निर्वाह निधी पावती, आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका इ. ची छायांकित प्रत सादर करावी. | अ)पगार पावतीची प्रत (पृ.क्र.प- )<br>ब)ओळखपत्राची प्रत (पृ.क्र.प- )<br>क)भविष्य निर्वाहनिधी पावतीची प्रत (पृ.क्र.प- )<br>ड)आधार कार्ड क्र.....................................<br>(पृ.क्र.प- )<br>इ)पॅन कार्ड क्र. .................................<br>(पृ.क्र.प- )<br>ई)निवडणूक ओळख पत्राची प्रत (पृ.क्र.प- )<br>उ)शिधावाटप पत्रिकेची प्रत (पृ.क्र.प- ) |
| ४ | ४.१.अर्जदाराने नोकरीसाठी अर्ज केल्याचा आवक जावक क्रमांक व दिनांक<br>४.२.सदर अर्जाची माजी सफाई कामगाराच्या सेवाभिलेखात नोंद घेतलेल्या पृष्ठाची छायांकीत प्रत | आवक-जावक क्र. .........................<br>दिनांक-.....................<br>(पृ.क्र.प- ) |
| ५ | अर्जदाराने वारसाहक्क नोकरीसाठी विहीत कालावधीत अर्ज केला आहे का ? | होय/नाही<br>अ)माजी कर्मचाऱ्याचा सेवा समाप्तीचा दि............<br>ब)अर्ज सादर केल्याचा दि...................... |
| ६ | विवाहीत स्त्री अर्जदाराच्या बाबतीत विवाहनंतर नावात बदलाबाबत:-<br>विवाह दाखला किंवा संयुक्त प्रतिज्ञापत्र**(जोडपत्र-५)** **आणि** नाव बदलल्याचे राजपत्र सोबत जोडले आहे का ? | होय.<br>अ) विवाह दाखला (पृ.क्र.प- )<br>ब) संयुक्त प्रतिज्ञापत्र (पृ.क्र.प- )<br>क) राजपत्र (पृ.क्र.प- ) |
| ७ | माजी सफाई कामगाराने वारसास/नामनिर्देशन व्यक्तीला नोकरी देण्याकरीता केलेला विहित नमून्यातील अर्ज **(जोडपत्र-२)**, ना-हरकत (संमती) प्रतिज्ञापत्र/शपथपत्र**(जोडपत्र-४)**सादर केले आहे का ? | अर्ज (पृ.क्र.प- )<br>ना-हरकत(संमती)प्रतिज्ञापत्र/शपथपत्र<br>(पृ.क्र.प- ) |
| ८ | अर्जदाराने माजी सफाई कामगाराचे/कुटुंबाचे पालनपोषण करणेबाबत व त्यांना सोबत राहू देण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र/शपथपत्र **(जोडपत्र-३)**, संयुक्त नाहरकत प्रतिज्ञापत्र**(जोडपत्र-७)**,क्षतीपुर्ती **(जोडपत्र-६)**बंधपत्र सादर केले आहे का ? | होय.<br>प्रतिज्ञापत्र/शपथपत्र (पृ.क्र.प- )<br>क्षतीपुर्ती बंधपत्र (पृ.क्र.प- )<br>संयुक्त नाहरकत प्रतिज्ञापत्र (पृ.क्र.प- ) |
| ९ | अर्जदाराने स्वयंघोषणापत्र प्रपत्र-अ **(जोडपत्र-८)** व स्वयं साक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र प्रपत्र-ब **(जोडपत्र-९)** सादर केले आहे का ? | होय.<br>प्रपत्र-अ (पृ.क्र.प- )<br>प्रपत्र-ब (पृ.क्र.प- ) |
| १० | सदर प्रकरण वारसाहक्क नियमानुसार अनुज्ञेय आहे का ? | ----------------------- |

माजी सफाई कामगाराच्या सेवा अभिलेखानुसार आणि माजी सफाई कामगाराने/अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या आधारे माहिती सादर करण्यात आली आहे. अर्जदाराने नोकरीकरिता आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे/प्रतिज्ञापत्रे/शपथपत्रे सादर केली असून, त्यांनी सर्व कादापत्रांच्या छायांकित प्रती स्वयं साक्षांकित केल्या आहेत.

अर्जदार श्री/श्रीमती.----------------------------------------------, माजी सफाई कामगार श्री/श्रीमती.------------------------------------------यांचा/यांची पती/पत्नी,मुलगा/मुलगी,सून/जावई, विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटित मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहीत सज्ञान मुलगी/अविवाहीत सज्ञान बहिण/नात/नातू, सफाई कामगार अविवाहीत असल्याने त्याचा सख्खा भाऊ/सख्खी बहिण आहे.

माजी सफाई कामगाराचे पती/पत्नी, मुलगा/मुलगी, सून/जावई, विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटित मुलगी/ बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहीत सज्ञान मुलगी/अविवाहीत सज्ञान बहिण/नात/नातू, सफाई कामगार अविवाहीत असल्याने त्याचा सख्खा भाऊ/सख्खी बहिण, घाणकाम/साफसफाईचे काम करण्यास तयार नाहीत अश्या आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.त्यामुळे माजी सफाई कामगाराने श्री/श्रीम------------------------------ यांना नामनिर्देशीत व्यक्ती घोषित केले आहे(पृ.क्र.प-      ).

अर्जदार श्री/श्रीम.---------------------------------------------------------- यांनी वारसाहक्क नियमावलीनुसार नोकरीकरिता दिनांक-..............रोजी विहित कालमर्यादेत अर्ज केला आहे. त्याचे/तिचे शिक्षण इयत्ता ------------------उत्तीर्ण आहे (पृ.क्र.प-          ). त्याने/तिने टंकलेखनाची मराठी------------प्रति मिनिट प्रति शब्द/इंग्रजी.........प्रति मिनिट/प्रति शब्द परिक्षा उत्तीर्ण केली असून त्याने MSCIT अभ्यासक्रम उत्तीर्ण केली आहे (प-      ). त्यामुळे तो/ती शैक्षणिक अर्हतेनुसार ---------------------------------या पदाकरिता पात्र ठरतात. अर्जदाराचा शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार/जन्म दाखल्यानुसार जन्म दिनांक ............... असा असून वारसाहक्क नोकरीसाठी (वयोमर्यादा ४५) तो/ती विहित वयोमर्यादेत बसतो/बसते. तसेच अर्जदाराने माजी कर्मचा-याचे/कुटुंबातील कायदेशिर वारस सभासदाकडून विहित नमुन्यातील संयुक्त प्रतिज्ञापत्र/ना-हरकत प्रतिज्ञापत्र, क्षतीपूर्ती बंधपत्र सादर केले आहे(पृ.क्र.प-          ). स्त्री अर्जदार विवाहीत महिला असल्यास त्यानुसार त्यांचे विवाहपूर्वीचे नाव श्रीम.----------------------आणि विवाहनंतरचे नाव श्रीम.-------------------------- आहे. विवाहनंतर नावात बदल झाल्याबाबतचे विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र/विवाह दाखला सादर केला आहे(प-       ).

सबब, सदर वारसाहक्क प्रकरणाची पडताळणी परिपत्रक क्र.प्रकाअ/०१ दि.१६.०४.२०२५ व परिपत्रक क्र.प्रकाअ/०४ दि.०१.०९.२०२५ अन्वये करण्यात आली असून, अर्जदार श्री/श्रीमती.------------------------- माजी सफाई कामगार श्री/श्रीमती.--------------------------------------------यांचा/यांची पती/ पत्नी, मुलगा/ मुलगी,सून/जावई, विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटित मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहीत सज्ञान मुलगी/अविवाहीत सज्ञान बहिण/नात/नातू, सफाई कर्मचारी अविवाहीत असल्याने त्याचा सख्खा भाऊ/सख्खी बहिण, नामनिर्देशित व्यक्ती असून त्यांचे वारसाहक्क प्रकरण परिपत्रक क्र.प्रकाअ/०५ दि.१६.१०.२०२५ अन्वये उप आयुक्त यांच्या मंजुरीकरिता सविनय सादर.

आस्थापना लिपिक
(कर्मचारी नाव/संकेतांक/स्वाक्षरी)

आस्थापना मुख्य लिपिक-
(कर्मचारी नाव/संकेतांक/स्वाक्षरी)

(सही आणि नाव)
प्रशासकीय अधिकारी/नियुक्ती प्राधिकारी
(प्राधिकारी-१)

(सही आणि नाव)
सहाय्यक आयुक्त/रुग्णालय प्रमुख/खाते प्रमुख
(प्राधिकारी-२)

(जोडपत्र-१)

# वारसाहक्क धोरणांर्तगत नोकरीसाठी अर्जदाराने सादर करावयाच्या अर्जाचा नमूना

अर्जदाराने
स्वयं साक्षांकित केलेले पारपत्र
आकारातील छायाचित्र

प्रेषक:-श्री/श्रीमती/------------------------------
पत्रव्यवहाराचा पत्ता:----------------------------
-----------------------------------------
-----------------------------------------
भ्रमणध्वनी क्र. ……………………………………………
ईमेल आयडी. ……………………………………………...
दिनांक. ------------------------------------

प्रति,
खाते/विभाग/रुग्णालय प्रमुख
बृहन्मुंबई महानगरपालिका
मुंबई.

विषय:- वारसाहक्क धोरणांतर्गत नोकरीकरीता अर्ज.

महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील --------------------------------- खाते/विभाग/रुग्णालयामध्ये ---------------पदावर काम करणारे श्री/श्रीमती---------------------------------------- हे/हया दि.---------------------रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले/झालेल्या किंवा होणार आहेत/१५ वर्ष अर्हकारी सेवा पूर्ण करुन स्वेच्छानिवृत्त झाले/झालेल्या आहेत/महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक यांचे वैदयकीय प्रमाणपत्र क्र.मवैप/--------------दि.-----------अन्वये महानगरपालिकेतील पुढील सेवेकरिता कायमस्वरुपी अपात्र (असमर्थ) ठरलेले आहेत/मृत्यू पावले/पावल्या आहेत.

मी अर्जदार श्री/श्रीम. ------------------------------------(आधार क्र)…………………. आपल्या खात्यातील श्री/श्रीमती.------------------------------------,पदनाम----------यांचा/ यांची पती/पत्नी, मुलगा/मुलगी, सून/जावई, विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटित मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहीत सज्ञान मुलगी/अविवाहीत सज्ञान बहिण/नात/नातू,सफाई कर्मचारी अविवाहीत असल्याने त्याचा सख्खा भाऊ/सख्खी बहिण, नामनिर्देशित व्यक्ती म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये वारसाहक्क धोरणांतर्गत **मला सफाई कामगार/सफाईगार या पदावर नोकरी द्यावी ही विनंती.**

किंवा

**माझ्या शैक्षणिक अर्हतेनुसार 'कामगार/आया/हमाल/कक्षपरिचर/कार्यालयीन शिपाई/कार्यकारी सहायक/कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक' पदावर नोकरी द्यावी ही विनंती. सदर पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर भविष्यात वारसाहक्क नोकरीचा लाभ माझ्या वारसास मिळणार नाही याची मला पुर्ण कल्पना आहे.**

या सर्व बाबी मला मान्य आहेत. सदर लेखी हमी मी कोणाच्याही दबावाखाली देत नसून मी स्वखुशीने आणि पूर्णपणे विचार करुन देत आहे.

**माजी सफाई कामगाराचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | वारसाचे नाव | माजी कर्मचाऱ्या सोबत असलेले नाते | वय/जन्म दिनांक | शैक्षणिक अर्हता | कमविती/ न कमविती | अवलंबून आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |

माझ्या सदर अर्जासोबत खालील आवश्यक ती जोडपत्रे/प्रतिज्ञापत्रे सादर करीत आहे.

मी उपरोक्त नमूद केलेली सर्व माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे बरोबर आणि खरी असून ती खोटी आढळल्यास, नियमानुसार होणाऱ्या कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

अर्जदाराची स्वाक्षरी --------------

(अर्जदाराचे नाव:---------------------)

**खालील कागदपत्रे अर्जासोबत सादर करीत आहे.**

| **(अ) माजी सफाई कामगार सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त/ अपात्र (असमर्थ) च्या बाबतीत अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे** | **(ब) माजी सफाई कामगाराचे निधन झाले असल्यास अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे** |
|---|---|
| १) अर्जदाराचे आधार कार्ड छायांकित प्रत (ओळखीचा पुरावा) | १) माजी सफाई कामगाराच्या आधार कार्डची छायांकित प्रत. |
| २) अर्जदाराचे पॅन कार्ड छायांकित प्रत (ओळखीचा पुरावा) | २) माजी सफाई कामगाराच्या पॅन कार्डची छायांकित प्रत |
| ३)अर्जदाराचा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला छायांकित प्रत (जन्म तारखेचा पुरावा) | ३) माजी सफाई कामगाराच्या ओळखपत्राची छायांकीत प्रत |
| ४) अर्जदाराने माजी सफाई कामगाराचे/कुटुंबातील व्यक्तींचा सांभाळ,पालनपोषण, वारसास सोबत वास्तव्यास राहण्यास परवानगी असल्याबाबत व माहिती खरी असल्याबाबतचे शपथपूर्व कार्यकारी दंडाधिकारी किंवा रजिस्टर पध्दतीने नोटरी केलेल्या शपथपत्राची मूळ प्रत.**(जोडपत्र-३)** | ४) माजी सफाई कामगाराच्या वेतन पावतीची छायांकीत प्रत |

| | |
|---|---|
| ५) विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र **(जोडपत्र-८)** | ५) माजी सफाई कामगाराच्या भविष्य निर्वाह निधीची छायांकीत प्रत |
